**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. –०१</u>** **<u>नि.दि.दा.क्र.५०/२०१८</u>**

**लक्ष्मीबाई विरुध्द सुनील**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ३० च्या खाली**

**<u>सरतपासणी शपथेवर सुरु वादी तर्फे वकील श्री.अग्रवाल यांच्या मार्फत</u>**

**१०.** मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो निशाणी ३० वर आहे.

**११.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ०१ व ०२ कडे नियमित दिवाणी दावा क्र.१३९/२००१ मधील निकाल व हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यांना **<u>निशाणी ३४ व ३५</u>** देण्यात येते.

**१२.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ०३ कडे नियमित दिवाणी दावा क्र.१३९/२००१ मधील निशाणी ५३ ताबा वारंटची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी ३६</u>** देण्यात येते.

**१३.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ०७ कडे विशेष कार्यकारी दंडाधिकारी, कामठी विभाग, नागपूर यांनी पोलीस ठाणे नवीन कामठी यांना दिलेल्या नोटीसीची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी ३७</u>** देण्यात येते.

**१४.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ०८ कडे नगर परिषद कामठी यांनी मला पाठविलेल्या नोटीसीची प्रत दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी ३८</u>** देण्यात येते.

**१५.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ०९ कडे मी नगर परिषद कामठी यांच्या कडे दिलेल्या अर्जाची पोच दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ३९</u>** देण्यात येते.

**१६.** मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक १० कडे मी पोलीस ठाणे नवीन कामठी यांच्या कडे दिलेल्या अर्जाची पोच दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ४०</u>** देण्यात येते.

**१७**. मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक ११ कडे मी नगर परिषद कामठी यांच्या कडे दिलेल्या अर्जाची पोच दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४१** देण्यात येते.

**१८**. मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक १२ व १३ कडे मला पोलीस ठाणे नवीन कामठी यांनी दिलेल्या सुचनापत्राच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यावर माझ्या सहया आहेत.त्यांना **निशाणी ४२ व ४३** देण्यात येते.

**१९**. मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक १४ कडे पोलीस निरीक्षक नवीन कामठी यांनी मला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये दिलेल्या नोटीसी प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी ४४** देण्यात येते.

**२०**. मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक १६ कडे मी प्रतिवादीला माझ्या वकीलामार्फत पाठविलेल्या दिनांक ०८/०६/२०१८ रोजी च्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४५** देण्यात येते.

**२१**. मी कागदयादी निशाणी ३३ अनुक्रमांक १७ ते १९ कडे प्रतिवादी तसेच नगर परिषद कामठी व पोलीस ठाणे नवीन कामठी यांना नोटीस पाठविल्या पोस्टाच्या मुळ पावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना **निशाणी ४६ ते ४८** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**
( अमित अ. कुळकर्णी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी

कामठी
दिनांक ०६/०२/२०२४